10. बंधनकारक राहील, माल चांगल्या गुणवत्तेचा व मागणीप्रमाणे असणे आवश्यक आहे. त्यामध्ये भेसळ असता कामा नये.

11. पुरवठादाराने मंदिरे समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या प्रमाणामध्ये चांगल्या प्रतीचा व गुणवत्तेचा माल पुरवठा करावयाचा आहे. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत, प्रमाण, गुणवत्ता संबधीत विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

12. सदर कामाचा मंजुर दर व जी.एस.टी, व्यतिरीक्त इतर कोणतेही कर अदा केले जाणार नाही. तसेच सदर कामाचे बील अदा करताना नियमानुसार २% आयकर व जी. एस. टी. , टी. डी. एस. कपात केली जाईल. पुरवठा कामाचे देयके मासिक/एकरकमी अदा करण्यात येतील.

13. कि स्वीच पुरवठा केलेनंतर देण्यात येणारे दरपत्रक जी एस टी सह द्यावे तसेच आपले बील देखील जी एस टी सह देण्यात यावे.

14. सदर कामासाठी ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

15. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस पुरवठा धारक जबाबदार राहील

16. दरपत्रकात नमुद केलेल्या कामासाठी पुरवठा धारकाने दुसऱ्या पुरवठा धारकास काम दिल्याचे आढळल्यास पुरवठाधारकाचे मंजुर दरपत्रक रद्द करून, त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

17. पुरवठा कामाचे देयक सादर करताना देयकामध्ये आदेशातील वर्णनाप्रमाणे संपूर्ण तपशील असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये. देयक छापील स्वरूपात असावे. त्यामध्ये बील क्रमांक दिनांक, मालाचे वर्णन, दर, जी.एस.टी., सही, शिक्का, व इतर अनुषंगीक बाबीचा समावेश असावा

18. पुरवठाधारकांच्या अटी व शर्तीबाबत कोणत्याही ठेका धारकास न्यायालयामध्ये दाद मागता येणार नाही.

19. कमी जास्त दराचे दरपत्रक स्विकारणेचा, नाकारण्याचा अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे. त्याबद्दलची कारणे, स्पष्टीकरण देणे मंदिरे समितीवर बंधकारक राहणार नाही.

20. कि स्वीच पुरवठा दरपत्रक कार्यादेश नसुन फक्त बीड ऑफ कोटेशन मागविण्यासाठी आहे.

21. मंदिरे समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटी व शर्तीत जे बदल करेल ते पुरवठा धारकास बंधनकारक राहील.

22. कि स्वीच पुरवठा करतेवेळी काही वाद उद्भवल्यास त्यासाठी न्यायालयीने कार्यक्षेत्र पंढरपूर, जि. सोलापूर हे राहील.

23. प्रशासकीय व अन्य कारणास्तव किंवा कोणतेही कारण न देता दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द अथवा स्थगित ठेवण्याचा अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेला आहे.

**श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर जि.सोलापूर - ४१३३०४**

**विद्युत विभाग/का.वि./ /२०२५**

श्री. विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे '**श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवासाकरीता ३७५ नग कि स्वीच खरेदी करणे कामाचे एकूण सर्व करांच्या दरासह**' दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

1. कि स्वीच पुरवठा करणेकामीची माहिती कार्यालयीन वेळेत श्री.विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास विभाग येथे उपलब्ध होवून मिळतील. दरपत्रक स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात दि.१०/०१/२०२६ सायंकाळी ०५.०० पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. लिफाफ्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि 'कि स्वीच पुरवठा जी एस टि सह दर' पुरवठाकामी भरलेले आहे असा सविस्तर तपशिल नमूद करावा. दरपत्रक समक्ष श्री. संत तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोष्टाने पाठवावे. उशिरा आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत.
2. कि स्वीच पुरवठा कामाबाबत अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक : 02186 – 228888.
3. कि स्वीच पुरवठा कालावधीत सदर प्रक्रियेस विलंब झाल्यास, बदल झाल्यास त्याचे सर्व अधिकार कार्यकारी अधिकारी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांनी राखून ठेवलेले आहेत.
4. कोणतेही दरपत्रक अगर सर्वच दरपत्रके कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिरे समितीने राखुन ठेवलेले आहेत.
5. पुरवठा धारकाच्या कोणत्याही शर्ती व अटी मंदिरे समितीवर बंधनकारक असणार नाहीत.
6. मंजुर पुरवठा धारकास मालाचा पुरवठा मंदिरे समितीचे मागणी नुसार पुरवठा आदेश दिल्यानंतर १५ दिवसांच्या आत करणे बंधनकारक आहे. त्यास विलंब झाल्यास पुरवठा धारकास जबाबदार धरून मालाच्या किंमतीच्या ५ % पर्यंत दंड आकारण्यात येईल.
7. मालाचा पुरवठा मागणीप्रमाणे न आलेस अथवा योग्य प्रतीचा/गुणवत्तेचा नसल्यास अगर ठरवून दिलेल्या मुदतीत न झाल्यास मंदिरे समितीची अडचण होऊ नये. म्हणून द्वितीय, तृतीय न्युनतम पुरवठा धारकांकडून अगर इतर पुरवठाधारकांकडून बाजार भावाने आवश्यकतेनुसार मालाची खरेदी करण्यात येऊन त्यासाठी जादा लागलेल्या फरकाची रक्कम पुरवठा धारकाच्या बीलातून अथवा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसुल करणेत येईल..
8. पुरवठा कालावधीमध्ये शासकीय कार्यालयाकडून कर, ऊपकर, जकात यांचे दरामध्ये काही बदल झाल्यास त्याबाबत समिती व्यवस्थापनाकडे मागणी करता येणार नाही.
9. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/नैसर्गीक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल उदा. आग, महापूर, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भुकंप वैगेरे) पुरवठाधारक मालाचा पुरवठा करू शकला नाही व त्यामुळे पुरवठाधारकाचे नुकसान झाल्यास, त्यासाठी मंदिरे समिती व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

माल खराब असल्याचे आढळून आलेस जेवढा खराब असेल तेवढा माल बदलून देणे पुरवठाधारकावर

| | |
|---|---|
| ॥रामकृष्णहरी॥ | कार्यकारी अधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे कार्यालय<br>जि. सोलापूर - ४१३३०४ |
| संदेश संजीवनी देवेंद्र भोसले<br>व्यवस्थापक, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती | फोन नं -(०२१८६)२२४४६६/२२३५५० <br>ईमेल - eotemple@gmail.com |

विद्युत विभाग का.वि./ /२०२५ दिनांक: २६/१२/२०२५

-: जाहीर दरपत्रक :-

विषय :- श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती विद्युत विभाग येथे कि स्वीच दरपत्रक पाठविणे बाबत...

भक्तनिवासातील सर्व खोल्यांमध्ये कि स्विच बसवणेचे अटी व शर्ती श्री विठ्ठल रूक्मिणी भक्तनिवास व मंदिर समितीच्या vitthalrukminimandir.org या अधिकृत संकेतस्थळावर पहावयास मिळतील. आपले कडील दरपत्रक या कार्यालयाकडे दि.१०/०१/२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत श्री संत तुकाराम भवन येथे सिलबंद लिफाफ्यात सादर करावे. दरपत्रक उशिरा अथवा अपूर्ण असल्यास विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | तपशील | नग | प्रति नग किंमत | एकुण रक्कम (जी एस टी सह) |
|---|---|---|---|---|
| १ | ३२ ॲंपियर डीपी स्वीच | ३७५ | | |
| | | एकुण | | |

श्री विठ्ठल रुक्मिणी, वेदांत व व्हीडिओकॉन भक्तनिवास येथील खोल्यांमध्ये ३७५ नग कि स्वीच खरेदी करणेच्या अटी व शर्ती मंदिर समितीच्या vitthalrukminimandir.org या अधिकृत संकेतस्थळावर पहावयास मिळतील. आपले कडील दरपत्रक या कार्यालयाकडे दि.१०/०१/२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत श्री संत तुकाराम भवन येथे सिलबंद लिफाफ्यात सादर करावे. दरपत्रक उशिरा अथवा अपूर्ण असल्यास विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(संदेश भोसले)
व्यवस्थापक,
श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.